आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

७ ऑक्टोबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नक्षलवादी कारवायांविरुद्धची लढाई अंतिम टप्प्यात असून सर्व घटकांकडून सहकार्य मिळाल्यास मार्च २०२६ पर्यंत देश पूर्णपणे नक्षलमुक्त होईल असा गृहमंत्री अमित शहा यांना विश्वास

- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची द्वैमासिक आढावा बैठक आज मुंबईत सुरू
- माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचा भाजपाला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश

  **आणि**
- राज्यात आज दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू तर दहा जण जखमी

**<><><><><>**

नक्षलवादी कारवायांविरुद्धची लढाई अंतिम टप्प्यात असून सर्व घटकांकडून सहकार्य मिळाल्यास मार्च २०२६ पर्यंत देश पूर्णपणे नक्षलमुक्त होईल असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक आज अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत झाली, त्यानंतर ते बोलत होते. नक्षलवादाने कोणाचंही भलं झालेलं नाही. नक्षलवादी मार्ग चोखाळणाऱ्या सर्वांनी मुख्य प्रवाहात येऊन शस्त्रांचा त्याग करावा असं आवाहन त्यांनी केलं.

महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगण, ओडीशा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री बैठकीत उपस्थित होते. याशिवाय या राज्यांमधल्या विकासाशी संबंधित मंत्रालयांचे मंत्री, राष्ट्रीय सुरक्षा उपसल्लागार, सुरक्षा दलाचे अधिकारीदेखील उपस्थित होते. केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळे या राज्यांमधल्या नक्षलवादी कारवायांमधे 72 टक्के घट झाली असून त्यांचा बीमोड करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं गृहमंत्रालयानं म्हटलं आहे. सरकारनं या भागात दळणवळण आणि संपर्क व्यवस्थेच्या विकासासाठी अनेक उपाययोजना केल्याचंही मंत्रालयानं नमूद केलं आहे.  या भागात १४ हजार किलोमीटर लांबीचे रस्ते बांधण्यात आले तसंच सहा हजार मोबाईल टॉवर्स उभारण्यात आले.

चालू वर्षात २०२ नक्षली अतिरेकी सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकींमधे मारले गेले तर ८१२ अतिरेक्यांना अटक झाली. या वर्षात ८१२ नक्षल्यांनी शरणागती पत्करली असून नक्षलप्रभावित जिल्ह्यांची संख्या आता ३८ वर  उतरली आहे, अशी माहिती गृह मंत्रालयाने दिली आहे.

**<><><><><>**

भारत  आणि मालदिवचे संबंध जुने असून भारत हा मालदिवचा सगळ्यात जवळचा आणि घनिष्ट मित्रदेश आहे. भारताने सदैव मालदिवसाठी चांगल्या शेजाऱ्याची भूमिका निभावली आहे. या परस्पर सहकार्याला धोरणात्मक दिशा देण्यासाठी सर्वसमावेशक अशा आर्थिक आणि सागरी सुरक्षेला प्राधान्य देण्याचं आजच्या चर्चेत केलं, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली इथं केलं. मालदिवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईजू यांच्याबरोबर प्रतिनिधीमंडळ स्तरावर

चर्चा झाल्यानंतर ते बोलत होते. यावेळी उभय देशांमध्ये अनेक सामंजस्य करार झाले.

**<><><><><>**

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीचे निकाल उद्या जाहीर होणार आहेत. उद्या सकाळपासून केंद्रशासित प्रदेशातल्या वीस मतमोजणी केंद्रावर कडक सुरक्षा व्यवस्थेत मतमोजणीला सुरुवात होईल. मतमोजणी केंद्र उभारलेल्या सर्व जिल्हा मुख्यालयांमध्ये आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व मतमोजणी केंद्रावर केंद्रीय सशस्त्र पोलीस दल, राज्य सशस्त्र पोलीस दल आणि जिल्हा पोलीस दलाच्या तुकड्या तैनात केल्या आहेत. मतमोजणी केंद्र आणि स्ट्रॉंग रुमच्या सुरक्षा व्यवस्थेवर पोलीस उपअधिक्षक देखरेख करतील.

हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी झालेल्या मतदानाची मतमोजणीही उद्या होणार आहे.

**<><><><><>**

अन्नपदार्थातली भेसळ रोखण्याच्या दृष्टीनं तसंच गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीनं केंद्रीय अन्नप्रक्रीया उद्योग मंत्रालयातर्फे देशभरात १०० प्रयोगशाळा सुरु करण्यात येणार आहेत. केंद्रीय अन्नप्रक्रीया आणि उद्योग मंत्री चिराग पासवान यांनी आज फिक्कीतर्फे आयोजित कार्यक्रमात ही माहिती दिली. अन्नपदार्थांची नासाडी थांबवण्यासाठी रेडिएशन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल असं ते म्हणाले.

**<><><><><>**

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी आज भाजपाला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. भाजपा सोडताना आपण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्याशी चर्चा करून आपली भूमिका मांडल्याचं पाटील यांनी सांगितलं. इंदापुरातल्या कार्यकर्त्यांच्या आणि जनतेच्या आग्रहामुळे हा निर्णय घेतल्याचं पाटील म्हणाले. हर्षवर्धन पाटील यांची मुलगी अंकिता यांनीही भाजपाच्या सर्व पदांचा राजीनामा देऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे.

**<><><><><>**

आमदार बच्चु कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार राजकुमार पटेल हे शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. येत्या १० ऑक्टोबरला मुख्यमंत्री शिंदे मेळघाट दौऱ्यावर येणार असून त्यांच्या उपस्थितीत आपण शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती पटेल यांनी आज दिली. बच्चु कडू यांनी स्थापन केलेल्या तिसऱ्या आघाडीतून आपण विधानसभा निवडणुकीत निवडून येऊ शकणार नाही, त्यामुळे हा निर्णय घेत असल्याचं पटेल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात आज सकाळी दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला, तर दहा जण जखमी झाले आहेत.

तुळजापूरहून दर्शन घेऊन आलेली भाविकांची एक कार सोलापूर-सांगली महामार्गावर मालवाहू ट्रकला धडकल्यामुळे भीषण अपघात झाला. यात दोघांचा

जागीच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. हे भाविक कोल्हापूर जिल्ह्यातले रहिवासी आहेत.

वाशिम जिल्ह्यातल्या पुसद-वाशिम मार्गावर चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे कार दरीत कोसळली, यात दोघांचा मृत्यू झाला तर सात जण जखमी झाले आहेत. जखमींना वाशिममध्ये रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सर्व प्रवासी अहिल्यानगर जिल्ह्यातले रहिवासी असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

मुंबईत माहीम इथं मोहित हाइट्स या रहिवासी इमारतीच्या चौथ्या मजल्यावर काल भीषण आग लागली. या आगीमुळे इमारतीतील काही रहिवासी अडकले होते, मात्र अग्निशमन दलाच्या जवानांनी त्यांना सुरक्षित बाहेर काढलं. आगीत घरातलं सामानसुमान जळून खाक झालं. आगीचं कारण समजू शकलं नाही.

**<><><><><>**

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मध्य रेल्वेनं नागपूरसाठी विशेष रेल्वे गाडी सोडण्याचं नियोजन केलं आहे. पुणे-नागपूर विशेष रेल्वे गाडी पुण्याहून ११ ऑक्टोबरला दुपारी ४ वाजता सुटेल आणि दुसऱ्यादिवशी सकाळी पावणे सात वाजता नागपूरला पोहचेल. ही गाडी नागपूरहून १२ ऑक्टोबरला रात्री ११ वाजता सुटेल आणि पुण्याला दुसऱ्यादिवशी रात्री ८ वाजता पोहचेल.

**<><><><><>**

मुंबईतल्या नायगाव इथल्या बीडीडी चाळीचं नामांतर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर बीडीडी संकुल असं करण्यात आलं आहे. या चाळीत डॉक्टर आंबेडकर

राहत असत, तसंच इथं आंबेडकरांचे अनुयायी मोठ्या प्रमाणावर राहतात, त्यामुळे चाळीला त्यांचं नाव द्यावं अशी मागणी स्थानिक नागरिक अनेक दिवसांपासून करत होते. ही मागणी मान्य करत राज्य सरकारने चाळीचं नाव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर बीडीडी संकुल असं करण्याचा आदेश जारी केला आहे.

**<><><><><>**

देशातल्या प्रत्येक न्यायालयानं न्याय सर्वांसाठी हे ब्रीद घेऊन कार्य करणं अभिप्रेत आहे, असं प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केलं आहे. अकोला जिल्ह्यातल्या मूर्तिजापूर इथल्या दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या कोनशिलेचं अनावरण, गवई यांच्या हस्ते काल झालं, त्यावेळी ते बोलत होते. न्यायदानाच्या माध्यमातून, आर्थिक आणि सामाजिक विषमता दूर करणं राज्यघटनेला अभिप्रेत आहे. आपल्याला राज्यघटनेने दिलेले हक्क आणि अधिकार, हीच भारतीयांची प्रेरणा असल्याचं, गवई यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यातल्या बोरविहीर ते नरडाणा या मनमाड-इंदूर रेल्वे मार्गाच्या पहिल्या टप्प्याचं काम सुरू झालं आहे. तसंच नव्या धुळे रेल्वेस्थानकाच्या कामालाही सुरुवात झाली आहे, अशी माहिती माजी केंद्रीय मंत्री सुभाष भामरे यांनी दिली. धुळे ते नरडाणा दरम्यान सहा रेल्वेस्थानकं असतील. यात बोरविहीर, न्यू धुळे, निमखेडी, कापडणे, सोनगीर, नरडाणा या स्थानकांचा समावेश आहे.

मनमाड-इंदूर रेल्वेमार्गासाठी टप्प्याटप्प्याने भूसंपादन करण्यात येणार आहे. २०२९ पर्यंत या रेल्वेमार्गाचं काम पूर्ण करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

यंदाचा केशवसृष्टी पुरस्कार मुंबईतल्या 'टीच' संस्थेचे संस्थापक अमन शर्मा यांना जाहीर झाला आहे. १ लाख रुपये, मानचिन्ह आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे आहे. मूकबधीर मुलांचं उच्च शिक्षण, विविध क्षेत्रातलं कौशल्य शिक्षण आणि त्यांना उत्पन्नाच्या संधीं मिळवून देण्यासाठी 'टीच' संस्था काम करते. येत्या १३ तारखेला विलेपार्ले इथं आयोजित कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार दिला जाईल.

केशवसृष्टी पुरस्कार निवड समितीच्या सदस्य आणि मुंबईच्या माजी महापौर डॉ. शुभा राऊळ यांनी आज वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

**<><><><><>**

हवाई दल सैनिकांच्या अखिल भारतीय शिबिरात महाराष्ट्र संचालनालयाने सांघिक उपविजेतेपद पटकावलं. बंगळुरूमधे जलहळ्ळी हवाई दल तळावर हवाई कवायतींची प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली होती.

**<><><><><>**

सोंघे सिंगापूर खुल्या बिलियर्ड्स स्पर्धेत भारताच्या पंकज अडवाणीने काल सिंगापूरच्या जेडेन ओंग याला ५-१ ने नमवत विजेतेपद पटकावलं. यानंतर आता पंकज येत्या नोव्हेंबर महिन्यात दोहा इथं होणाऱ्या बिलियर्ड्सच्या जागतिक विजेतेपदाच्या स्पर्धेत सहभागी होत आहे.